# रिल्स स्पर्धा
# (रुग्ण समुपदेशनावर आधारित)

१. पात्रता:
- सहभागी असलेले औषध व्यवसायी (फार्मासिस्ट) महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेचे नोंदणीकृत असले पाहिजेत.
- स्पर्धक महाराष्ट्र रहिवासी पंजीकृत औषध व्यवसायी (फार्मासिस्ट) असावेत.

२. रिलमध्ये समाविष्ट करावयाची माहिती:
- रिलमध्ये रुग्ण समुपदेशनावर आधारित खालील माहिती असावी:
- औषधे कशी घ्यावीत याबद्दल मार्गदर्शन.
- औषधांचा वापर आणि संकेत.
- संभाव्य दुष्परिणाम आणि खबरदारी.
- रुग्णांसाठी उपयुक्त असलेली इतर आरोग्यविषयक माहिती.
- रुग्ण समुपदेशन मराठी भाषेत असावे.

३. कालावधी:
- रिल १५ ते ४५ सेकंदांच्या दरम्यान असावी.
- ४५ सेकंदांपेक्षा जास्त असलेली सादरीकरणे स्पर्धेतून अपात्र ठरवली जातील.

४. सादरीकरणाची अंतिम तारीख:
- स्पर्धेसाठी रिल सादर करण्याची अंतिम तारीख १८ सप्टेंबर २०२४ आहे.

५. रिल सादरीकरण मार्गदर्शक तत्त्वे:
- रिल व्हिडिओ (MP4, MOV) किंवा तत्सम स्वरूपात सादर करावी.
- सहभागींनी रिल एका ठराविक माध्यमाद्वारे (उदा. इंस्टाग्राम) अपलोड करावी आणि पोस्टच्या वर्णनात #MSPCPatientCounseling हा हॅशटॅग वापरावा.
- सहभागींनी महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या खालील अधिकृत सोशल मीडिया हँडल्सला टॅग करावे.

Facebook: @Maharashtra State Pharmacy Council
Instagram: @maharashtra.pharmacy.council
X (पूर्वीचे Twitter): @MSPCindia

**- रिलची लिंक परिषदेच्या अधिकृत नोंदणी फॉर्मद्वारे सादर करावी.**

६. मौलिकता आणि साहित्य चोरी:

- रिल ही केवळ आणि केवळ सहभागीने स्वत: तयार केलेली असावी.
- कोणत्याही प्रकारचे साहित्य चोरी (प्लॅजिअरिझम) आढळल्यास सहभागी तात्काळ अपात्र ठरेल.
- परवानगीशिवाय तत्सम कॉपीराइट केलेले सामग्री (संगीत, चित्र, क्लिप्स, इ.) वापरता येणार नाही.

७. मूल्यांकन:

- रिल्स चे मूल्यांकन खालील मुद्यांच्या आधारावर केले जाईल:
- दिलेल्या माहितीत सुस्पष्टता.
- वापर केलेल्या सामग्रीची सुसंगतता आणि अचूकता.
- सादरीकरणातील सर्जनशीलता.
- प्रेक्षकांवरिल प्रभाव आणि संवाद साधण्याची क्षमता.
- खालील प्रत्येक श्रेणीमध्ये एक विजेता (प्रत्येक विभागातून एकूण ५ विजेते निवडले जातील):

1. कम्युनिटी फार्मासिस्ट
2. शासकीय रुग्णालय फार्मासिस्ट
3. मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह
4. फार्मसी महाविद्यालय / संस्था/ फार्मसी शिक्षक
5. उत्पादन क्षेत्रातील फार्मासिस्ट

८. बक्षिसे:

- प्रत्येक श्रेणीत पाच बक्षिसे दिली जातील.
- सर्वोत्तम विजेत्यांना परिषदेतर्फे ६ विभागातून प्रत्येकी ५ विजेत्यास सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान केले जाईल.

९. बौद्धिक संपदा:

- स्पर्धेत सहभागी झाल्याने स्पर्धक, महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या शैक्षणिक आणि प्रचारात्मक उपक्रमांसाठी त्यांच्या रिलचा वापर करण्याचे अधिकार देतात.
- महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद भविष्यकाळात कोणत्याही सार्वजनिक किंवा व्यावसायिक प्लॅटफॉर्मवर ते प्रकाशित करण्याचे अधिकार राखून ठेवते. परिषदेला रिल सादर केल्याने सहभागीने सध्याच्या आणि भविष्यकाळात ती रिल वापरण्याची अटल परवानगी दिली आहे.

१०. अपात्रता:
- वरिल अटींचे पालन न करणारी कोणतीही सादरीकरणे अपात्र ठरवली जातील.
- परिषद कोणतीही प्रवेशिका आपल्या इच्छेनुसार अपात्र ठरवण्याचा अधिकार राखते.

११. संपर्क माहिती:
- कोणतीही शंका असल्यास, सहभागी महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेला dicmspc@gmail.com वर संपर्क करू शकतात.

१२. अस्वीकरण:
- MSPC कोणत्याही कायदेशीर, आर्थिक समस्यांसाठी जबाबदार ठरणार नाही.
- रिलमध्ये दिसणाऱ्या व्यक्तींच्या गोपनीयतेचे संरक्षण रिल निर्मात्याने करणे आवश्यक आहे आणि सहभागी MSPC ला भविष्यातील कोणत्याही समस्यांपासून सूट देतो.
- रिल तयार करण्याच्या खर्चासाठी सहभागी स्वतःच जबाबदार असतील.

**टीप:**
**महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेचा निर्णय अंतिम असेल आणि सर्व सहभागींसाठी बंधनकारक असेल. उपरोक्त संदर्भास अनुसरून भविष्यात इतर कोणत्याही तक्रारी महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच कडून स्वीकारल्या जाणार नाहीत.**